# मोका कारवाईतील सराईत नामचीन चैनस्नॅचरला अटक करुन चैन स्नॅचिंग मधील लाखोची मालमत्ता हस्तगत

नारपोली पोलीस स्टेशन ठाणे, गुन्हा रजिस्टर नंबर ९१/२०१६ भा.द.वि.क. ३९४, ३४ सह मुंबई पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५, सह महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण सन १९९९ चेकलम ३(१)(दोन), ३(२),३(४) या गुन्हयातील आरोपीत नामे सर्फराज फिरोज बेग ऊर्फ इराणी ऊर्फ जाफरी ऊर्फ सय्यद, वय २८ वर्ष रा. आंबीवली कल्याण, जि. ठाणे यास दि.०५/११/२०१७ रोजी २२.३० वाजता अटक करुन त्याची मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, ३ रे न्यायालय शिवाजीनगर, पुणे यांचे न्यायालयातून दिनांक ११/१२/२०१७ पर्यत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली होती. त्याचेकडे पोलीस कस्टडी रिमांड मुदतीत तपास करुन त्याचे कडून ७२ ग्रॅम वजनाचे एकूण किं. रु. २,०८,८००/- रुपयाची २ मंगळसुत्र हस्तगत करुन, खालील पोलीस ठाणे -

१. वारजे माळवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजिनंबर २९०/२०१७ भा.द.वि.क. ३९२,
२. चंदननगर पोलीस स्टेशन गुन्हा रजिंनंबर ३०५/२०१७ भा.द.वि.क. ३९२ हे गुन्हे उघडकीस आणण्यात आलेले आहेत.

आरोपित हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन, नमुद आरोपीत विरुध्द मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, येथे चैन स्नॅचिंगचे १४ पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत. आरोपिताने अजमेर, नाशिक येथे अशा प्रकारचे गुन्हे केलेलेअसल्याचे निष्पन्न होत आहे.

आरोपित हा अजमेर येथुन येवुन पुण्यात पायी जाणारे महीलांचे गळयातील सोन्याचे दागीने स्नॅचिंग करुन मोटर सायकलवरुन पळून जाण्याची सवय आहे. सदरचा आरोपी मोक्यातील असून त्याचे बरोबर खालील चैनस्नॅचर गुन्हेगार आहेत. ते सध्या जेल मध्ये आहेत.

१.गुलाब हुसेन ऊर्फ गुलाब आब्बास मोहसीन इराणी ऊर्फ जाफरी रा आंबीवली
२.महमंद कमरअली जाफरी रा भिवंडी
३.अली जाहूर जाफरी ऊर्फ इराणी रा आंबीवली
४. आब्बासी ऊर्फ आब्बासीखान ऊर्फ इराणी रा आंबीवली
५. शाहीदअली सर्फराजअली मस्तान हजरी रा आंबीवली
६.अफरजअली ऊर्फ तबरेज बाबरअली जाफरी रा आंबीवली
७. हमजेन नुरजाम रज्जा रा आंबीवली
८. इक्बाल शमीम खान रा मुंब्रा
९. सकीना जान सय्यद रा आंबीवली

वरील कामगिरी श्री. प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हेशाखा श्री. पंकजडहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हेशाखा १ यांचे मार्गदर्शना खाली श्री. सिताराम मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, युनिट ३ गुन्हे शाखा, श्री. रविंद्र बाबर, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस कर्मचारी अशोक भोसले, शिवानंदन स्वामी, अनिल भोसले, कल्पेश बनसोडे, महेंद्र पवार, गजानन गाणबोटे सुजित पवार यांनी केली आहे.

